# प्रकरण दुसरे -
# स्त्रीवाद-तात्वीक भुमिका आणि स्वरूप

## प्रकरण दुसरे

## स्त्रीवाद - तात्त्विक भूमिका आणि स्वरूप -

स्त्रीवादी साहित्याचा विचार करत असतांना साहित्यातील " स्त्री " चा आपणास प्रथम विचार करावा लागतो. कारण स्त्रियांचे म्हणून जे साहित्य निर्माण होऊ लागले त्याच्या मुळाशी कोणत्या प्रेरणा, कोणते प्रयोजन होते याचा विचार करावा लागेल. म्हणून पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांचे स्थान, तिचे प्रश्न, तिच्या समस्या, या सर्वांचा जेव्हा विचार करतो, तेंव्हा या सर्व प्रश्नांचा, समस्यांचा स्पर्श त्यांच्या साहित्यातून जाणवू लागतो. कारण एकूणच मानवाच्या पातळीवर स्त्रीकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन तपासणे गरजेचे आहे.

एकूणच जगभर सुरवातीला स्त्रीकडे बघण्याचा एक समान दृष्टीकोन होता. जी सोव्हीयत स्त्री आज आघाडीवर आहे तिची मध्ययुगीन काळातील स्थीती भारतीय स्त्रीच्या स्थितीशी मिळती जुळती होती. तिच्या वाट्याला गुलामीचे जीवन आलेले होते. कोणतेच हक्क तिला नव्हते. मुले होण्याच्या बाबतीत तीला स्वातंत्र्य नव्हते. राजकिय व सामाजिक जीवनातील सहभागावर बंदी होती. वधू पैसे देवून विकत घेतली जात होती. व नव-याचा शब्द अखेरचा होता. ही परिस्थिती बदलत गेली ती १९०५ च्या पहिल्या स्त्री क्रांतीने, पुढे ही क्रांती चिरडून टाकण्यात आली. पण तरीही या क्रांतीने स्त्रीयामध्ये जागृती घडवून आणली.

अशिया खंडातील चीन मध्येही जवळजवळ हजार वर्षे स्त्रीची कहानी ही अशीच दुर्दैवाची होती. सरंजामदार, टोळीचे नायक, बडे शेतकरी यांचे जनानखाने ही प्रतिष्ठेची ठिकाणे होती. नडलेल्या लोकांना कर्जे देत व त्यांच्या मुलींनां हवे तसे वापरत असत. तेथेही जरठविवाह, बलात्कार, नव-याची मारझोड, विधवा विवाह, बंदी, स्त्री भ्रूणहत्या आदी गुदमरुन

टाकणारी परिस्थिती होती " गोल्ड फ्लॉवर " या विवाहीत महिलेने अपार यमयातना भोगल्या त्यामुळे तिने स्त्रियांना संघटित करून स्त्रियांना माणूस म्हणून कांही हक्क मिळाले पाहिजेत यासाठी प्रयत्न केला.

सारांश २० व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत जगातील सर्वच स्त्रियांची आवस्था गुदमरून टाकणारी होती. पुरूषी वर्चस्व असलेल्या समाजात तिचे स्थान अगदी नगण्य होते. शेकडो वर्षे स्त्रिया तुरूंगात ठाणबध्द होत्या. स्वतःचे कांही वेगळे अस्तित्व आहे हे न मानणे हाच एक नितिनियम होता. वैयक्तिक सुखाची तिची स्वप्ने केवळ स्वप्नेच ठरत. समाजातील सर्व अन्यायांचे ओझे तिला आपल्या शिरावर वागवावे लागे. भयंकर आर्थिक दारिद्रय असलेल्या समाजात बेकार नवरे संसाराचे ओझे पत्नीच्या गळयात बांधून पलायन करीत असत. घरकाम, पोटासाठी लहानसहान व्यवसाय, इतकेच काय पण घर चालवण्यासाठी देह विक्रयही तिला करावा लागे. बहुपत्नीत्व व बालविवाह, पुरूषांची पिसाट बळजबरी आदी अन्याय तिला पचवावे लागते. बहुपत्नीत्ववादी नवऱ्यांची निष्ठा नसणे हा गुन्हा मानला जाई. नव-याच्या मृत्यूनंतरही त्यांच्या स्मृतीशी बेईमानी खपवून घेतली जात नसे. तेंव्हा सर्वच दृष्टीने तिची मुस्कटदाबी होत होती. इंग्लंड, अमेरिकन, स्त्रियांही याला अपवाद नव्हत्या, त्यांनाही विसाव्या शतकाच्या मध्या-पर्यंत मतदानाचा हक्क प्राप्त झाला नव्हता. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदा-साठी " स्त्रीने " उभे राहू नये, हाच संकेत आतापर्यंत जोपासला गेला होता. आजही स्त्री विषयक पारंपारिक भावना सहजपणे बदलेल असे वाटत नाही. स्त्री व पुरूष समान आहेत या विचाराचा स्विकार फार सोसले हे नाकारता येत नाही. " कोणताही मानव मुक्तीचा लढा मग तो दलितांचा असो वा स्त्रियांचा असो तो वेदनेने भरलेला असतो. भारतीय स्त्रीमुक्ती लढा याला अपवाद नाही."[१] या पार्श्वभूमिवरच भारतीय स्त्रियाचाही विचार करावा लागतो. वेदकालीन स्त्रियांचा विचार करतो, तेंव्हा असे लक्षात येते की जीवनाच्या विविध क्षेत्रात तिचा उल्लेख आदराने व गौरवाने केला

जाई. तिच्या विव्दतेचा मान केला जाई. ज्ञानाच्या क्षेत्रातही स्त्रियांची संख्या बरीच होती. विवाहीत स्त्रियांना घटस्फोट घेण्याचाही अधिकार होता. तेंव्हा स्त्री व पुरुष हे श्रेष्ठ - कनिष्ठ न मानता ते समान व पुरक मानीत. म्हणून एकमेकांविना त्यांचे आयुष्य अपूर्ण मानले जाई. असे असूनही भारतीय स्त्रीला असे उपेक्षित जीवन का जगावे लागले ? स्त्री चारित्र्याबाबत अधिक संवेदनशीलता का निर्माण झाली ? शिक्षण व नृत्य याचा अधिकार विशिष्ट वर्गातील स्त्रियानांच का मिळाला ? याचे कारण सांगताना डॉ. नाडगौडा म्हणतात - " आर्य व अनार्य यांच्यामध्ये वैवाहिक संबंध प्रस्थापित होऊ नयेत ." [२] हे आहे म्हणूनच स्त्रियांच्या चारित्र्यावर करडी नजर राहू लागली. त्या काळातील अनार्य स्त्रियांना धार्मिक विधी-बाबत नियंत्रण येऊ लागले. पुत्र प्राप्तीला लाभलेले महत्व, विवाह वय, धार्मिक सहभाग, शिक्षणाची उपेक्षा आदिमुळे स्त्रियांचा दर्जा खालावत चालला. तशात पूर्वीची शेतीप्रधानता असल्यामुळे एकत्र कुटुंब पध्दती होती. त्या कुटुंबात घरची सर्वच जबाबदारी ही स्त्रीवर येऊन पडली. त्यामुळे तिचे कार्यक्षेत्र मर्यादीत राहिले. त्यातच पितरपुजा, व धार्मिक कर्मकांड यांचे स्त्रोत वाढले. अशा धार्मिक परंपरेने स्त्रियांवरील बंधने वाढतच गेली. देवदासी पध्दती, बालविवाह पध्दत, जरठकुमारी विवाहपध्दत, सती प्रथा यासारख्या रुढीमुळे स्त्रियांची स्थिती तर अगदी केविलवाणी झाली. पण नंतर मात्र एक प्रबोधनाचा काळ म्हणून ब्रिटीश काळाकडे पाहिले जाऊ लागले. त्या काळात स्त्रियांची स्थिती सुधारु लागली, पण १८५७ च्या बंडानंतर ब्रिटीश सत्ता पोळून निघाली. त्यामुळे त्यांनी आपले उदारमतवाद धोरण बदलले आणि भारतीय धार्मिक गोष्टीत ढवळाढवळ न करण्याचा निर्णय घेतला. एका बलाढय राष्ट्रांतही धार्मिक रुढीला भारतीय परंपरेत धक्का देता आला नाही. त्यामुळे भारतीय धार्मिक श्रध्दा किती खोलवर रुजली आहे याची जाणीव होते. या धर्मांच्या आधारावर स्त्रीपुरुषांचा विचार होत असल्याने या विचारात बदल होणही कठीण आहे, हे स्पष्ट होते. तरीपण इंग्रजांच्या नव विचारसरणीमुळे एक नवी

पिढी उदयाला आली. त्यामुळे त्यांना भारतीय समाज व्यवस्थेतील कांही रुढी विचार मान्य नव्हते. म्हणूनच राजाराम मोहनरॉय सारख्या समाजसुधारकाने मूर्तीपूजा, कर्मकांड यावर कडाडून हल्ला केला. ब्रिटीशांच्या नव्या विचार धारणेतूनच पुनर्विवाह, बहुपत्नीत्व, बालविवाह, सती चाल याविषयी लोक जागृती केली. अनेक समाजसुधारकांनी स्त्री सुधारणे विषयक निश्चित लोकमत जागृत करून स्त्री सुधारणा केल्या. या सुधारणेचा सुरवातीला उच्च वर्गातील स्त्रियांना फायदा झाला. पण समाजातील दलित व इतर कनिष्ठ जातीतील स्त्रियांची स्थिती अधिक दयनिय होती. त्यासाठी म. फुलेनी पाऊल उचलले, त्यांनी १८४८ मध्ये पुणे येथे स्त्रियांसाठी शाळा काढली. आणि परंपरागत मध्ययुगीन समाजव्यवस्था उखडून टाकण्याचे व्रत हाती घेतले. सुरवातीपासून म. फुल्यांचे स्त्री-पुरुषाविषयी बघण्याचा समानतेचा दृष्टिकोन होता. पुरुषाप्रमाणेच स्त्रीला देखील सर्व हक्क व अधिकार मिळावेत हे त्यांनी अग्रहक्काने मांडले, म्हणूनच त्यांनी सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात म्हटले आहे की - " आपल्या सर्वांच्या निर्माण कर्त्याने एकंदर सर्व प्राणी-मात्रास उत्पन्न केले. त्यापैकी स्त्री-पुरुष हे उभयता जन्मतांच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र आहेत असे कबूल करणारे, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत."[3] यातून स्त्री-पुरुष समानतेचा व स्त्री स्वातंत्र्याचा विचार त्यांनी मांडला आहे हे स्पष्ट होते. इतकेच नव्हे तर त्यांनी स्त्रीला पुरुषापेक्षा श्रेष्ठ स्थान दिले आहे. " सार्वजनिक सत्यधर्म " मधील " स्त्री आणि पुरुष " या प्रकरणात ते म्हणतात - " निर्मिकाने निर्माण केलेल्या चमत्कारिक मोह उत्पन्न करणाऱ्या भवसागरांतून तरंगून मजा मारणारे क्षणिक उभयतां मानवप्राणी आहेत. त्यांतून स्वभावेंकरून स्त्रीची जात भिडस्त असल्यामुळे ती प्रथम एका पुरुषास सलगी करण्यास सवड देते. आणि ती सलगी हा कामार्थी धूर्त पुरुष इतकी वाढवितो कीं, अखेरीस स्त्री स्वत: होवून त्यास आपला मदतगार, वाटेकरी, सखा करिते, आणि तीच सृष्टी नियमांस अनुसरून आपल्यांतील सर्व मुलांचे तर काय, परंतु आर्य

13311
A

मठातील नाडबंद ब्रम्हचारी शंकराचार्यांच्या तोलाच्या मुलाचें सुध्दा आपल्या उदरी कांकू केल्याशिवाय निमूटपणें नवमास रात्रीदिवस सतत ओझें वागविते. तीच आपल्या सर्वांस जन्म देणारी होय. आपले मलमूत्रादि काढून आपल्या सर्वांचे लालन व पालन करून आपल्या सर्वांचा परामर्ष करणारी होय. आपण सर्व पंगू लाचार असतां सर्वकाळ आपली काळजी वाहते. व तिनेंच आपल्या सर्वांस चालावयास व बोलावयास शिकविलें, यावरून एकंदर आबाल वृध्दांत जगप्रसिध्द म्हण पडली आहे की, " सर्वांचे उपकार फिटतील परंतु आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकार फिटणार नाहीत. " यास्तव नि:संशय पुरूषापेक्षा स्त्री माझ्या मते श्रेष्ठ आहे.. " [४] असे विचार म. फुले यांनी मांडून स्त्री मानवी जीवनातील स्त्रीचे महत्व स्पष्ट केले आहे. फुले, आगरकर, गांधी सारख्या उच्च लोकांनी स्त्रियांच्या मूलभूत प्रश्नांचा गांभिर्याने विचार केला. त्यांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी अखेरपर्यंत प्रयत्न केला आणि स्त्रियांचे क्षेत्र " चूल आणि मूल " यापुरते मर्यादित न ठेवता ती घराबाहेर पडली पाहिजे हा विचार समाज मनात जागृत केला.

थोडक्यात असे म्हणता येईल की भारतीय स्त्रियांचा आजचा दर्जा ही अनेक समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नाचा परिणाम आहे हे विसरता येत नाही. आज आर्थिक सामाजिक, राजकिय क्षेत्रात स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने काम करतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्यांचा संचार सुरु झाला. पण खरीखुरी स्त्री मुक्ती झाली का ? तिचे सर्व प्रश्न सुटलेत का ? या सर्व प्रश्नांचे उत्तर आपणांस नकारात्मकतेनेच द्यावे लागते. कारण अजूनही स्त्री म्हणावी तितकी मुक्त झालेली नाही. तिच्या इच्छा-आकांक्षा यांना अजूनही पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये स्थान नसल्याचे दिसून येते. अशा अनेक दु:खातून तिला मुक्त व्हावयाचे आहे. परंपरागत स्त्री विषयक विचार समाजात खोलवर रुजला आहे. याच विचारापासून स्त्रीला मुक्ती हवी आहे. आजही स्त्री शिक्षणाने जागृत झाली आहे. तिला आपल्या गुलामगिरीची जाणीव झाली आहे. ती बंधनातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि अशी आपली जाणीव ती साहित्यातून व्यक्त करत आहे. आपले स्वत:चे जीवन व्यथा, वेदना, विचार व्यक्त करण्यासाठी तिने स्वत:चे असे एक

साहित्य दालन उभे केले आहे. यालाच आज स्त्रीवादी साहित्य म्हटले जाते.

*

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात अनेक बदल झाले. ग्रामीण दलित, आदीवासी, प्रादेशिक अशा अनेक जाणीवेतून साहित्य निर्मिती झाली. हे होण्यात सामाजिक, राजकिय, अर्थिक घटकही कारणीभूत आहेत. कारण साहित्य हा एक सामाजिक घटक आहे. तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब त्यात पडत असते. त्यामुळे समाज बदलाबरोबर साहित्यही बदलते. अशा बदलत्या जीवनाचे चित्रण म्हणून वरील प्रमाणे साहित्यात वेगवेगळे साहित्यप्रवाह निर्माण झाले. गांधीजीच्या " खेडयाकडे चला " या संदेशाने संपूर्ण भारतीयांचे लक्ष खेडयाकडे वळले. त्यामुळे ग्रामिण जीवनाचा, संस्कृतीचा विचार प्रामुख्याने पुढे येवू लागला. व ग्रामीण संवेदनशीलता व्यक्त होणारे ग्रामीण साहित्य निर्माण झाले. त्याचप्रमाणे पाश्चात्य विचारसरणी, फुले-आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीतून प्रेरणा घेवून दलित नव सुशिक्षित पिढी पुढे आली. यातून दलित साहित्याची निर्मीती झाली. अशा प्रकारे पाश्यात्य विचारसरणी व नवशिक्षण, नवीन मूल्ये यातून भारतीय समाज जीवनाचे वेगवेगळया अंगातून अवलोकन होवू लागले. याचा परिपाक साहित्यावर झाला. आणि त्यातूनच भारतीय स्त्री-वादाची पुसटशी कल्पना येवू लागली. सामाजिक चळवळी प्रमाणेच बाबासाहेबानी भारतीय घटनेमध्ये स्त्रियांचा प्रामुख्याने केलेला विचार व त्यांना दिलेले अधिकारही घटना देखिल स्त्रीवादाच्या दृष्टीने महत्वाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री विषयक विचारांचे हिंदू कोड बिलात मांडला ते सांगताना उर्मिला पवार लिहितात - " ज्याप्रमाणे भारतीय स्त्रीची सामाजिक उच्च दर्जाची बुध्दकालीन जी परमोच्यता मनूने अवनत केली. तिला जबरदस्त हादरे देण्याचे कार्य जोतीराव फुल्यांनी केले. त्याच दीप्तीने प्रज्वलित होवून बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या रुपाने जे कार्य केले ते ऐतिहासिक व युगप्रवर्तक असेच आहे. त्यांनी भारतीय घटना प्रमुख म्हणून स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने जे अभूतपूर्व असे हिंदू कोड बिल सादर केले ती भारतीय स्त्रीच्या हातापायांत जखडलेल्या गुलामगिरीच्या बेडया तोडणारी महत्वपूर्ण घटना होती.

" हिंदू कोड बिलात बाबासाहेबांनी स्त्री - मग ती कोणत्याही जातिधर्माची असो - ती दलितच आहे लक्षात घेऊन -

१) स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार दिला.

२) नव-याने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळावी.

३) व्यक्तीचा एक विवाह कायदेशीर असल्यास व दुसरा विवाह योग्य कारण नसल्यास अवैध ठरून स्त्रीला स्थैर्य दिले.

४) स्त्रियांना दत्तक घेण्याचा व दत्तक जाण्याचा अधिकार दिला

५) स्वतःच्या मिळकतीवर स्त्रीचा अधिकार असावा.

६) वडिलांच्या मिळकतीत मुलग्याच्या बरोबरीने मुलींना समान हिस्सा दिला.

७) मुलीला वारसा होण्यास अधिकार मिळाला.

८) आंतर जातीय विवाहास मान्यता दिली.

९) स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचाही अधिकार मिळाला.

या देशातील पुरुषप्रधान समाजरचनेने धर्मशास्त्र्यांचा, पुराणांचा, मनुस्मृतीचा दाखला देवून स्त्रियांचे हक्क आणि अधिकार नाकारले. ते सर्व हक्क आणि अधिकार भीमस्मृतीने अर्थात हिंदू कोड बिलाने स्त्रियांना दिले आहेत. हे बिल पास होईपर्यंत बाबासाहेबांनी अनेकाकडून नाना त-हेने धमक्या आणि विरोध सहन केला. मानहानी सोसली. अखेर आपल्या मंत्रीपदाचा १९५१ च्या सप्टेंबरमध्ये राजीनामाही दिला आणि अखेर ते बिल पास झाले. अनेक त-हेचे मूलभूत अधिकार स्त्रियांना मिळवून देवून संपूर्ण भारतीय स्त्रीच्या विकासाचा प्रगतीचा, उज्जयनाचा मार्ग मोकळा करून दिला. स्त्री ही पुरुषाप्रमाणेच एक पूर्ण व्यक्ती आहे हे सिध्द केले. "[५] आणि इथूनच परिवर्तनाला सुरुवात झाली. हे परिवर्तन जसे सामाजिक आहे, तसेच हे सांस्कृतीक आहे. या परिवर्तनामागे राजकीय घटनेप्रमाणेच सामाजिक चळवळीचे ही फार मोठे योगदान आहे. ज्या पध्दतीने दलित चळवळीतून दलित साहित्य निर्माण झाले. तसेच स्त्री चळवळीतून स्त्रीवादी साहित्य निर्माण झाले.

पण स्त्रीवाद म्हणजे काय ? भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्रीचे स्थान काय ? आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेला स्त्रीवादी साहित्य याचा उहापोह करावा लागतो.

१९७४ साली टोरान्टो येथे जी एक वैयक्तिक गरज म्हणून स्त्री मुक्तीची संकल्पना जन्माला आली या संकल्पनेतूनच स्त्रिवादाला सुरवात झाली. यानंतर १९७५ साली स्त्रीदशक जाहीर झाल्याची महत्त्वपूर्ण घटना घडली याबद्दल निलिमा भावे म्हणतात - " १९७५ साली स्त्रीदशक जाहीर झाल्यावर स्त्रीवादाच्या विचाराची व भावनांची शक्तीशाली लाट सर्व जगभर पसरत गेली."[6] भारतामध्ये तिचा परिणाम खोलवर झाला. भारतातील स्त्रियांचा स्वत:चा असा खास स्त्रीमुक्तीवाद प्रसुत झाला. भारतीय स्त्रियांशी आर्थिक शोषणाच्या विरोधात संघटित व्हायला सुरवात केली. भारतीय स्त्री ही पाश्चात्यांच्या तुलनेत शंभर वर्षांनी मागासलेली होती. तिच्यावर परंपरेची, समाजाची, कुटुंबाची असंख्य बंधने होती. धार्मीक कर्मकांडात पूजा अर्चा करणे, पतीला परमेश्वर मानने, पुरुषाशी नजरेला नजर देवून न बोलणे, शिवाय घरातील आणि येणा-या पै-पाहुण्यांची व्यवस्था करणे यासाठी स्वत:ला आठरा आठरा तास बांधून घेणे. जरी शिकली सवरलेली असली तरी ऑफीसमध्ये नोकरी करणे, कारखान्यामध्ये नोकरी करणे पण येथेही "स्त्री" म्हणून वेगळी वागणूक, विषम वेतन, कामात फरक शिवाय कामाच्या ठिकाणी कामगार स्त्री म्हणून, घरात सून म्हणून, समाजात स्त्री म्हणून अशी असंख्य बंधने तिच्यावर होती. ही बंधने झुगारुन देणे आणि आपण कोणीतरी " स्वतंत्र " आहोत,आम्हालाही संधी मिळाल्यास पुढे जाता येते, ही जाणीव तिव्रतेने कांही स्त्रियांच्या ठिकाणी झाली आणि स्त्रीयांची होणारी अंतर्गत घुसमट बाहेर आली त्यातूनच स्त्री मुक्ती चळवळ उभी राहिली आणि महाराष्ट्रात ती अधिक जोमाने नेट धरु लागली व त्यातून स्त्रीवादी साहित्य ही नवी संकल्पना दृढमूल होऊ लागली. पण स्त्रीवाद हा मूळचा अमेरिकेत प्रथम रुजला त्यामुळे अश्विनी धोंगडे म्हणतात - " स्त्रीवाद किंवा फेमिनिझम ही कल्पना आपल्याकडे रुजलेली किंवा आपण निर्माण केलेली

नाही. पाश्चात्याकडून आपण ती आयात केली आहे."[७] म्हणून स्त्रीवादाचा अभ्यास करतांना ही कल्पना मुळामध्ये काय आहे याचा सर्वप्रथम विचार करायला हवा.

१९६० नंतर अमेरिकेमध्ये स्त्रीवादाचा प्रचार व प्रसार जोमाने झाला. त्यापूर्वीच्या १५ – २० वर्षांच्या काळात अमेरिकन स्त्रीचे कौटुंबिक जीवन विलक्षण विसंगतीने भरलेले होते. या काळापर्यंत स्त्रीया मोठया संख्येने उच्च शिक्षण घेवू लागल्या होत्या. त्या नोक-या करु लागल्या होत्या. आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्या एकेकटया राहण्याचे धाडसही करु लागल्या होत्या. पण त्या प्रौढ वयाच्या होत्या. करिअर साठी नोकरी करणा-या नव्हत्या. त्या अर्धवेळी नोकरी करणा-या विक्रेत्या, सेक्रेटरी अशा दुय्यम, तिय्यम पदावरच्या, आर्थिक हातभाराची संसाराला जरुरी असणा-या नवरा किंवा मुलांचे शिक्षण होईपर्यंत पैसा मिळवणा-या अशा होत्या. अगर विधवा वा घटस्फोटीत होत्या. व्यवसायात स्त्रियांची संख्या नगण्य होती. नर्सिंग, समाजकार्य, शिक्षण या पेशात स्त्रियांची चणचण भासत होती. कारण या बायकांना फक्त एकच स्वप्न होते. लकर लग्न व्हावे, चारतरी मुले असावीत. शहराच्या चांगल्या भागात सर्वसज्ज घर असावे . आरोग्य संपन्न, कुटुंब, सुंदर व श्रीमंत नवरा, गुटगुटीत मुले, गाडी, बंगला या पलीकडे स्त्रियांची मागणी नव्हती. त्या काळात पत्नी व आई या पदाला समाजात मान होता. " आदर्श गृहीणी " या संकल्पनेला मान होता. गाडया, कपडे, घरगुती उपकरणे यांची खरेदी करणें एवढी या स्त्रीयांची खास क्षेत्रे होती. नवरा व मुले यांचा दिनक्रम ठरविणे, हुकुमत गाजविणे यातच आपण पुरुषांच्या जीवनाच्या समान भागीदार आहोत असा तिला विश्वास होता. कांही वर्षे अशा सुखसमाधानात राहिल्यावर स्त्रिया स्वत:लाच प्रश्न करु लागल्या. मी कोण ? घर संसार एवढेच किती दिवस करायचे ? माझ्या जीवनाचा हाच अर्थ आहे काय ? स्त्रीच्या समस्या या फक्त मुले व नवरा यांच्या शिवाय संबंधित आहे का ? स्त्री म्हणून घरकाम करण्यात आपल्याला समाधान वाटत नाही.

म्हणजे आपल्यात कांही कमी आहे का ? व्यक्तिगत पातळीवरील असे असमाधान प्रत्येकीच्या मनात खदखदू लागले होते. आतून जीव पोखरणारे हे असमाधान नव-याकडे व्यक्त करावे तर त्याला ते नीटसे काय हवे आहे हे स्वत:लाही न समजल्याने उडणारा मानसिक गोंधळ प्रत्येकीलाच त्रास-दायक वाटू लागला, आणि हळूहळू ही समस्या एकीची नाही तर सगळ्या-चीच आहे हे लक्षात येवू लागले. त्याला कांही विशिष्ठ नांव देता येणार नाही, तो हा प्रश्न होता तरी काय ? तर मला फार पोकळ वाटते, अपूर्णता वाटते, मी म्हणजे कुणीच नाही, असे म्हणणे किंवा लवकर थक-ल्यासारखे वाटणे, हताशपणा, नैराश्य, चिडचिडे, अबोल, रडावेसे वाटणे या लक्षणातून तो व्यक्त होत गेला. म्हणजेच ही अमेरिकन स्त्री आपणच निर्माण केलेल्या " आदर्श गृहीणी " या प्रतिमेच्या सापळ्यात सापडली होती. आधुनिक गृहीणी, आदर्श पत्नी, आई, दायी, स्वयंपाकीण, शिक्षिका, धुणेवाली, भांडीवाली इ. भूमिका आदर्शवत वठविण्यात, तिच्या दिवसाचे तुकडे झाले. माणूस म्हणून माणसासारखे जगणे अपराधीपणाचे वाटत होते. ती नवरा व मुले यांच्यासाठी व यांच्यामार्फत जगत होती. पुरुषांच्या जगात पुरुषासाठी जगल्याने स्त्रीच्या माणूसपणावरच गदा आली. प्रत्येक लहान सहान गोष्टीवर निर्णयाच्या बाबतीत पुरुषावर अवलंबून राहण्याची सवय झाल्याने स्त्रीला मानसिक परावलंबीपण आले. स्वाभिमान, आत्मगौरव, यशाची इच्छा मारुन टाकून माणसाचा जो कोंडमारा होतो त्याला स्त्री बळी पडली होती. हे जेंव्हा ती अलिप्तपणे पाहू लागली. तेंव्हा तिला " स्वत्याची " जाणीव झाली. त्याचबरोबर शिक्षण आणि सामाजिक कार्यातील क्रियाशील सहभाग या स्त्रियांचा प्राथमिक गरजा आहेत याची जाणीव तिला झाली. त्यातूनच स्त्रिवादाची संकल्पना दृढमूल होवू लागली. या संकल्पने विषयी अश्विनी धोंगडे म्हणतात " स्त्रिवाद म्हणजे पुरुषापासून फारकत घेवून स्वत:चा सवता सुभा करणे नव्हे पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारुन तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करुन दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी

निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे."[8] अशा व्यासपीठावरून स्त्रीया आपला नविन पट मांडू लागल्या. यातूनच स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षा निर्माण झाली. त्यामध्ये प्रामुख्याने स्त्रीयांदी समीक्षेचा विचार करावा लागतो स्त्रीवादी समीक्षा म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात देता येत नाही. कारण संपूर्ण स्त्री मुक्तीच्या संदर्भातच स्त्रीवादी विचारसरणीचे पैलू नजरेस येतील.

स्त्रीवादी समीक्षेचा विचार करतांना कांही शब्दाचे अर्थ स्पष्ट करावे लागतात. " फिमेल "म्हणजे स्त्री आणि " फेमिनिझम " म्हणजे स्त्री प्राधान्य व " फेमिनिष्ठ " म्हणजे स्त्रीवादी. स्त्रियांनी लिहिलेली म्हणून स्त्रियांची पुस्तके स्त्रीवादी ठरत नाहीत. स्त्री साहित्याची वाङ.मयीन परंपरा स्त्रीवादी म्हणता येत नाही. यात स्त्रीकेंद्री असा वाङ.मयीन कलाकृतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हवा. स्त्रीवादी समीक्षा ही राजकीय हेतूची समीक्षा आहे. पितृ-प्रधान संस्कृतीने स्त्रियांच्या अनुभवांना अनेकदा दाबून टाकले आहे. म्हणून स्त्रियांनी साहित्यातून आपले अनुभव व्यक्त करणे व पितृप्रधान पध्दतीला वाङ.मयीन माध्यमातून दिलेला धक्का देणे होय. " जाणिव जागृती " हा स्त्रीचळवळीचा मुख्य आधार असल्याने अशा खास अनुभवांना अविष्कृत करणारे साहित्य हे स्त्रीवादी मानले जावू लागले. केवळ बाई असणे म्हणजे स्त्रीवादी असणे नव्हे, स्त्रियांनी लिहिलेली म्हणून स्त्रिवादी असेही नव्हे. ज्या साहित्यात स्त्री केंद्रस्थानी आहे अशीही पुस्तके स्त्रीवादी नाहीत. स्त्रीया म्हणून खास अनुभव असलेले साहित्य हे स्त्रीवादी असलेच असे नाही. पण याला जाणीव जागृतीचे साहित्य असे म्हणता येईल. स्त्रीवादी साहित्य समजावून घेण्यासाठी समाजातील लिंगवादी दृष्टीकोनाची चर्चा केली पाहिजे. लिंगभेदावर अधारीत समाजाचे दोन घटक एक स्त्री व दुसरा पुरूष असे पडतात. हे घटक शारीरीक भेदावर आहेत. पण तरीही परंपरा आणि संस्कृतीच्या दंडका नुसार 'बायकी' व 'पुरूषी' या दोन विशेषणांना शरीर भेदा व्यतिरिक्त सांस्कृतिक अर्थ चिकटलेला दिसतो. सिमान द बोव्हार म्हणतात -


"One is not born a woman, one becomes one".

कोणी बाई म्हणून जन्माला येत नाही पण नंतर ती बाई बनविली जाते. यात फार मोठा गर्भीत अर्थ दडला आहे. केवळ लिंग वैशिष्ठयामुळे एखादया व्यक्तीवर समाज बाईपणाच्या कल्पना लादत असतो. समाजाच्या मूल्यपध्दतीशी नाते जोडले जाते. उदा. स्त्रीही भावना प्रधान, शारीरिक दुर्बल असते. शरीर सौंदर्याचे प्रतिक असते. तर पुरूष हा शरीरसंपन्न, पराक्रमी, बुध्दीमान असतो. अशा प्रकारे संस्कृतीचे 'बायकी' व 'पुरूषी' या कल्पनांचे साचे बनवले आहेत. स्त्री त्याच्या समाजाने ठरवलेल्या कल्पना या स्वाभाविक आहेत, यावर स्त्रीचा विश्वास बसावा म्हणून पितृसत्ताक पध्दतीत शारीरिक दृष्टया स्त्री असणा-या प्रत्येकीवर सामाजिक नियमांची अनेक दडपणे लादली जातात. स्त्रीवादी हा गोंधळ तोडू इच्छितात.

स्त्री-पुरूष, बायकी - पुरूषी अशा प्रकारच्या विरोधी जोडया रूढ झालेल्या आहेत. पितृप्रधान पध्दतीमधील मूल्य पध्दतीशी याचे नाते जोडले जाणे हे विरोध समपातळीवरचे नसून उतरंडीचे आहेत. कारण स्त्रीची बाजू ही प्रत्येक वेळी नकारार्थी दुर्बल, अपात्र अशीच पाहिली गेली आहे. पुरूष - स्त्री हा शरीर भेद स्त्रीत नसलेले अनेक गुण सांगण्यासाठीच वापरला जातो आणि जन्मजात नसलेले अनेक गुण तिच्यावर लादले जातात. संस्कृतीच्या इतिहासात हे शब्द केवळ लिंगवाचक न राहता त्यांना लैंगिक राजकारणाचा संदर्भ प्राप्त झाला आहे. या संदर्भात अश्विनी धोंगडे - " एखाद्या गोष्टीला अर्थ प्राप्त होण्यासाठी दुस-या गोष्टीचा अंत करावा लागतो. पुरूषाला पराक्रमी ठरवायचे असेल तर स्त्रीला दुबळी ठेवावीच लागते. पुरूष स्वामी असेल तर दासीपद स्त्रीकडेच येते. पुरूषाला सामर्थ्यवान म्हणून सिध्द करण्यास स्त्रीला दुबळी ठेवावी लागते. पुरूष सक्रीय दाखवायचा असेल तर स्त्री निष्क्रिय दाखवावी लागते. विजय म्हणजे क्रियाशीलता आणि पराभव म्हणजे निष्क्रियता असा दृष्टीकोन यात होतो."[१] अशा प्रकारे स्त्रीपणा आणि क्रियाशून्यता यांच्या समीकरणामध्ये स्त्रीच्या क्रियाशीलतेला कुठलीच जागा नसल्याने त्याचा धिक्कार स्त्रीवादी साहित्याने केला आहे. पितृप्रधान संस्कृतीतील या प्रयत्नाचे विघटन किंवा उच्चाटन करणे, स्त्रीची जी प्रतिमा निष्क्रिय म्हणून

केली आहे तिला उजळविणे हे स्त्रीवादाचे लक्षण आहे. यासाठी स्त्रीच्या एका नव्या भाषेचा विकास करण्याची त्यांची कल्पना आहे.

स्त्रियांच्या बाबतीत स्थित्यात्मक ( Positional ) उपप-ती सांगितली जाते. पितृसत्ताक समाज रचना पध्दतीने स्त्रीत्व ही कल्पना निर्माण केली गेली. पुरूषी वर्चस्वामुळे स्त्रीही माणूस आहे हे दुर्लक्षीले गेले. या बाबत सांगताना तसलिमा नसरिन म्हणतात -" मूल्यवान कोशात " पुरूष " या शब्दासाठी समानार्थी शब्द दिलेले आहेत. ते असे पुरूष, माणूस, मुलगा, पोरगा, मरद, मददा मर्द, मिनसे, नर, मानव, मानुष, मनुष्य, आदमी. आता "नारी" या शब्दासाठी काय शब्द दिलेले आहेत ते पहा - स्त्री, बाई, स्त्रीलोक, रमणी बाईमाणूस, मुलगी, महिला, ललना, अंगना, वामा, रमा, मानवी, मानविका, कामिनी, अबला, औरत, जनाना, योषित, योषिता, योषा, जनी, बाला, प्रमदाजन, वनिता, भामिनी, शबरी, आणि प्रतीपदर्शिनी, "पुरूष" या शब्दासाठी दिलेल्या समानार्थी शब्दाच्या तुलनेत "नारी" या शब्दासाठी दिलेल्या शब्दांची संख्या अधिक आहे. हे खरं, पण "माणूस" हा शब्द फक्त पुरूष या शब्दाच्या समानार्थी वापरला आहे. "नारी" या शब्दाच्या समानार्थी शब्दात कोठेही "माणूस" वा "मनुष्य" शब्द वापरलेला नाही."[१०] पुरूषी वर्चस्वाच्या दृष्टिकोनातून स्त्रीही माणूस आणि अराजक यांच्या सीमेचे प्रतिनिधित्व करु शकेल, पण स्त्रियांना मुख्य प्रवाहातून बाजूला लोटल्यामुळे त्या मागे गेल्या आहेत. व बाहयात्कारी अराजकामधेच मिसळल्या आहेत. प्रतिकरचनेमधील मर्यादा म्हणून स्त्री ही सर्व गुणधर्माच्या सीमारेषेवरच आहे, असे म्हणता येईल. ती माणूस म्हणून मुख्य प्रवाहात नाहीच.



स्त्रीही टोकाच्या दोन भूमिकांमध्ये बसविली आहे. याबाबत सांगताना डॉ.सौ. शुभांगी भूतकर म्हणताना - "पुरुषी संस्कृती स्त्रीला स्थितीनुसार रूप देवू पाहते. एकतर नकारात्मक भूमिकेतून राक्षसी, हडळ, कुलटा, पापीणी, अशा हीन वर्गात तिची गणना केली जाते. किंवा उच्चादर्श भूमिकेतून दुष्टसंहारक शक्तीची देवता, प्रेम, वात्सल्य, कारुण्य यांचा मूर्तीमंत झरा म्हणजे आदर्श स्त्री अशा उज्वल रूपात स्त्रीची प्रतिमा मांडली जाते."[११] तसे पाहिले तर "स्त्री" ची ही दोन्ही रूपे दिशाभूल करणारी आहेत. या दोन कडेच्या प्रतिमांच्या भूमिकेमागेही पुरुषी राजकारण दिसून येते.ती एक माणूस आहे. स्त्रीवाद हा "माणूस" या भूमिकेतून स्त्रीचे चित्रण करतो. समाजामध्ये प्रस्थापित असलेले लिंगभेदावर आधारलेले संकेत बदलले जावेत. ही स्त्रीवादाची भूमिका या विचारसरणीमागे आहे.

स्त्रीवादयाचा संघर्ष हा तिहेरी पातळीवरचा आहे. -

(१) स्त्रीला स्वातंत्र्य व समता मिळून रचनात्मक पातळीवरील समान दर्जा तिला मिळाला पाहिजे.

(२) फरकावर उभ्या राहणाऱ्या व पुरुषांनी निर्माण केलेल्या स्त्रीपणाच्या कल्पनेचे उच्चाटन केले पाहिजे.

(३) समाजाने पुरुषी व बायकी या निर्माण केलेल्या भेदात्मक तत्वज्ञानाला नकार देणे.


माणसाच्या समाजात स्त्रीला समतेचे स्थान हवे आहे. तरीपण स्त्री आणि पुरुष यांच्या अनुभव घेण्याच्या भेदावर भर देण्याची स्त्रीला जरुरी वाटते. हा फरक या पितृसत्ताकतेने निर्माण केला त्याला स्त्रीवादयांचा विरोध आहे. या - बद्दल सांगताना अश्विनी धोंगडे म्हणतात - " जोपर्यंत समाजात पितृसत्ताकाचे प्राबल्य आहे तो पर्यंत पितृसत्ताक पध्दतीतील स्त्रियांना स्त्रिया म्हणून हीन दर्जाने वागविण्याच्या वृत्तीला शह देणे व स्त्रियांचे स्त्रिया म्हणून समर्थन करणे स्त्रीवादाला राजकीय दृष्टया आवश्यक वाटते."[१२]

स्त्रीवादाला "पुरुषी" आणि " बायकी " अशा विरोधात्मक ठरविल्या गेलेल्या मुल्यावर हल्ला करणे आणि आपली राजकीय शक्ती पणाला लावून या

भेदामधली वास्तवता नजरेसमोर आणणे हे अधिक जरूरीचे वाटते या विवेचनावरून समीक्षेसंबंधी तीन बैठकींचा विचार अश्विनी धोंगडे यांनी मांडलेला आहे - " - "
"(१) फिमेल - जिथे एखादी स्त्री समीक्षक असणे गरजेचे आहे. (२) फेमिनिन - स्त्रीप्रधान समीक्षा - स्त्रीयावर वर्चस्व गाजविणा-या पुरुषी, समाजात दडपलेल्या, बाजूला टाकलेल्या, गप्प बसविलेल्या पण विशिष्ट राजकीय भूमिका न घेतलेल्या वाड.मयीन हुंकाराची समीक्षा.
(३) फेमिनिष्ठ - स्त्रीवाद - पितृसत्ताक पध्दती व लिंगवाद या विरूध्द राजकीय भूमिका घेणा-या साहित्याची समीक्षा "[१३]

जिथे तर्क, बुध्दी, तात्त्विक विवेचन या संकल्पना पुरुषी समजल्या जातात. अशा विवेचनाकडून ज्या संकल्पनांना लिंगाधारित वैशिष्टये चिकटवली जाणार नाहीत अशा समाजाकडे ही वाचटाल आहे.

स्त्रियांच्या म्हणून पुरुषापासून वेगळ्या असलेल्या जाणीवा व्यक्त होण्यासाठी नवीन भाषा व नवीन वाड.मयीन बंधाची स्त्रीवादी साहित्याला गरज वाटते. साहित्य निर्मितीला अनुभव हा महत्त्वाचा असतो. कांही अनुभव हे पुरुषी तर कांही खास स्त्रियांचे असतात. आजपर्यंतच्या साहित्यात स्त्री अनुभव हा मर्यादीत व तुजबी स्वरूपातच आला. स्त्री अनुभवाचा बराचसा भाग पुरुषी वर्चस्वामुळे अंधारातच राहिला.




वरील आकृतीवरून असे दिसून येते की, पुरुषाच्या अनुभवाची सावली स्त्री अनुभवावर पडली. पण अनेक अनुभवांचा स्त्रीचा असा खास भाग अंधारातच राहिला. अशा स्त्री अनुभवाचा अंधारातच असलेला भाग हा उजेडात आणणे हे स्त्रीवादी समीक्षेचे उद्दिष्ट आहे. याबाबत अश्विनी धोंगडे म्हणतात. - " स्त्रियांसाठी

उपलब्ध असलेली भाषा ही पुरुषांची मूल्ये आणि अनुभवांच्या पुरुषी संकल्पनेतून व्यक्त झालेली भाषा आहे. म्हणून स्त्रीच्या नव्या भाषेची आत्यंतिक गरज निर्माण होते. स्त्रीने आपल्या शरीरमाध्यमातून लिहावे कारण स्त्रीचे शरीर हा तिच्या लेखन सामर्थ्याचा एक स्त्रोत बनू शकतो. गर्भारपण, बाळंतपण वगैरे विषयावर फक्त स्त्रीच अधिकार वाणीने - वास्तव लिहू शकते. म्हणून आपल्या अनुभवांना शब्दरूप देणारी, कातडीला चिकटणाऱ्या शब्दांचे श्वास शोधणारी भाषा स्त्री वादीसाहित्याला हवी."-[१४] अशी वेगळी भाषा, वेगळे अनुभव व वेगळ्या जाणिवा स्त्रीवादी साहित्यातून प्रकट होवू लागल्या. म्हणजेच आज - पर्यंतच्या पुरुषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या साहित्यातून न आलेले असे स्त्रीचे खास अनुभव त्यातून व्यक्त होऊ लागले, त्याचबरोबर स्त्री पुरुष भेदाच्या पलीकडे जावून कलावंत म्हणून जीवनातील कांही विलक्षण असे अनुभव या साहित्यातून व्यक्त होवू लागले. स्त्रीयांच्या म्हणून पुरुषांच्या पासून वेगळ्या असलेल्या जाणीवा व्यक्त होण्यासाठी नविन वाङ्‌मयीन बंधाची स्त्रीवादी साहित्याला गरज वाटू लागली. उपलब्ध वाङ्‌मयीन आकृतीबंध पुरुषांचा असून आपल्या अनुभवांना अविष्कृत करण्यासाठी पुरुषी चौकटीत आपली निर्मिती बसविण्याऐवजी आपल्या अनुभवासाठी एक नवी चौकट स्त्रीवादी साहित्याने निर्माण केली त्या निर्मितीतूनच प्रामुख्याने प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द बंड केल्याचे दिसून येते. आज पर्यंत दबलेल्या भावनांचा उद्रेक, पुरुषी समाज व्यवस्थेत स्त्रीला दिली जाणारी वागणूक, समाजाची तिच्याकडे पाहण्याची वृत्ती या सर्वांवर स्त्रीवादी साहित्यातून हल्ला होताना दिसून येतो. आणि असे होणे हे सहाजिकच आहे. त्याप्रमाणे दलीत वर्गात शिक्षण व सामाजिक चळवळीने जागृति निर्माण झाली आणि या जागृतीतूनच त्यांनी आपले समाजातील स्थान काय ? याचा शोध घेऊन प्रस्थापित व्यवस्थेवर बंड करून उठले. त्याचप्रमाणे पाश्चात्य विचारधारेतून, फुल्यांच्या स्त्री शिक्षण पुरस्कारातून आणि भारतीय घटनेतील स्त्री पुरुष या समान विचाराने भारतीय स्त्री जागृत झाली आणि तीला स्वतःची ओळख झाली त्यामुळे आज पर्यंतचे आपले जगणे त्यासाठी शोध घेऊ लागली, आणि अशा शोधातूनच तिला आपणही माणूस आहोत याची जाणीव झाली. अशा जाणीवेतूनच स्त्रीया साहित्यातून आपला वेगळा विचार मांडू

लागल्या. हे मांडत असताना प्रस्थापित व्यवस्थेवर बंड करण्याची वृत्ती जशी आहे तशीच स्वत्व शोधण्याची आहे. म्हणूनच अश्विनी धोंगडे म्हणतात - " स्त्रीवादी साहित्याची भूमिका जशी प्रस्थापिता विरोधी बंड करण्याची आहे. त्याचप्रमाणे शोधकांची देखील आहे. हा शोध स्वत:चा आहे आणि आपल्याला मिळालेल्या दुय्यमत्वाची जाणीव झाल्यानंतरचा आहे. समाजाने स्त्रीकडून अपेक्षिलेल्या भूमिका पार पाडल्यावरही स्वत:ला समाधान न मिळाल्याचा साक्षात्कार जेंव्हा स्त्रीला होतो त्यावेळी ती स्वत:ला उणेकरून इतर चार चौघांसाठी जगते आहे हे तिला समजते. व मग मला काय हवे आहे ? हा स्वत:च्या मनात शोध सुरु होतो. स्वत:साठी घरातला एक राखीव कोपरा, स्वत:चा वेळ, स्वत:चा छंद आवडी निवडी यांच्या गरजेमधूनच स्त्रीची व्यक्ती म्हणून असलेली भूक जागी होते. आसपासच्या जगातील मिथ्यानाती उमगून येतात व पतीच्या पायावर आयुष्याचे सर्वस्व झोकून देणे म्हणजे जीवनाचे सार्थक नव्हे हे उमगते. स्त्रीवादी साहित्यात अशा प्रकारचा स्वयंचा घेतलेला शोध स्त्रीला तिच्या माणूसपणाकडे नेणारा ठरतो. "[१५] अशा माणूसपणाच्या शोधात असतानाच स्त्री ही जशी समाज व्यवस्थेतून मुक्त होऊ पाहते. तशीच ती साहित्याच्या क्षेत्रातूनही मुक्त होऊ पाहते. स्त्रीवादी साहित्यामध्ये कोणताही विषय मुक्तपणाने, कोणतीही चौकट न बाळगता हाताळला जात असल्याचे जाणवते. आणि हे स्त्री आत्मचरित्राद्वारेसारख्या वाङ्मय प्रकारातून स्पष्ट होऊ लागते. म्हणजेच आपण जे जगलो, जे भोगलो, जे अनुभवलो ते सर्व मुक्तपणाने साहित्यातून व्यक्त करु लागल्याचे दिसून येते. सुरवातीला या मांडणीत कांही मर्यादा होत्या. पण जसजशी स्त्री शिक्षित झाली तिचे अनुभव क्षेत्र विस्तारु लागले, तसतसे त्यांच्या साहित्यातून अधिकाधिक वास्तवता, दाहकता, स्पष्ट वक्तेपणा, निर्भिडपणा येऊ लागला. मराठी साहित्यामध्ये गेल्या दोन दशकात जी स्त्री आत्मकथेने निर्माण झाली त्यामध्ये पंडिता रमाबाई, ते मल्लीका अमर शेख हा विविध अनुभव चित्रणाच्या प्रवासाविषयी स्त्री आत्मकथानाचे संपादक

नलगे - पानतावणे म्हणतात - " पंडिता रमाबाईंची साक्ष म्हणजे एका नव्या जीवनाची चिकित्सा तर सावित्रीबाईंचे निवेदन म्हणजे पुराण संस्कृती आणि नवमूल्ये यांचा अप्रतिहत संघर्षच, रमाबाई रानडयांच्या आयुष्यातील आठवणीतून एक पतिपरायण, संस्कारक्षम, ईश्वरनिष्ठ स्त्री दृगोचर होते तर पार्वतीबाई आठवले यांची कहाणी म्हणजे काळाचे आव्हान स्वीकारीत स्वत:ला घडविणा-या सश्रध्द पण कर्तृत्वान स्त्रीचे प्रगट रूपच, जीवनाकडे काळवंडलेल्या नजरेने न पाहता आशावादित्वाचा किरण घेऊन वाटचाल करणा-या लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रे म्हणजे मराठी साहित्याचे चिरलेणेच, यशोदाबाई आगरकरांनी आपल्या कर्तृत्वान पतीच्या सांगितलेल्या आठवणींनी किती तरी नव्या घटनांवर प्रकाश पडला. आहे. आनंदीबाई कर्व्यांच्या आत्मपुराणातील मनस्वीपणा, कमलाबाई देशपांडयांच्या रमण साखळीतील अर्थहीन आत्मसमर्थने, लीलाताई पटवर्धनांनी कविपतीच्या सहवासातील चितारलेले बुध्दिवादी क्षण, आनंदीबाई शिर्के यांच्या " सांजवाती " तील खानदानी मराठी कुटुंबातील वातावरण, डॉ. केतकरांसारख्या असामान्य बुध्दीच्या सान्निध्यात हिंदू म्हणून निष्ठेने जगणा-या शीलवतीबाई केतकरांची समायोजकता, नृत्यसाधनेतील कडूगोड अनुभवांबरोबरच रोहिणी भाटयांनी परजलेला ध्येयवाद, दुर्गाबाई खोटेंच्या रुपेरी जीवनातील चढउतार, " आम्ही दोघ " मधील उषाताई भटांचे चळवळीतील जीवन, उद्‌ध्वस्त होऊ पाहणा-या मनाचे मल्लीका अमरशेखने केलेले रेखांकन ही सारी स्त्री-आत्मकथने मराठी " चरित्र-आत्मचरित्र " वाङ्‌मयात भर घालणारी ठरली आहेत. मराठीतील सर्वच स्त्री-आत्मकथने लक्षणीय आहेत असे नाही. भावुकतेने, पाल्हाळिकपणाने, आत्मभानाने किंवा पतीच्या सावलीत निमूटपणे वावरणारी आत्मकथनेही आज आहेत. भाई डांगे यांच्यासारख्या ध्येयवेडया माणसाची धर्मपत्नी म्हणून उषाताई डांगे यांनी सांगितलेल्या आत्मगौरवी आठवणी, स्नेहांकितातील आत्मश्लाघा आणि स्वत:चा लौकिक जपणारी सावध स्त्री, मुक्ताबाई दिक्षितांचे सामान्य असे प्रचीतीचे बोलणे, विवाहबाहय संबंधाची वाट चालताना वारंवार आत्मसमर्थन

करणा-या आनंदीबाई विजापुरे हीसुध्दा स्त्रीजीवनाची अंगेच होत. सामान्य अशी सरब्सोट कहाणी सांगणारी अनेक आत्मकथनेही आहेत. त्या सर्वांचा निर्देश करणे केवळ अशक्य आहे.

मात्र अलीकडल्या काळात ज्या एका धीट पण प्रांजळ आत्मकथनाने मराठी वाड.मयात चर्चा घडविली ते आत्मकथन म्हणजे " सांगत्ये ऐका ". एका उद्ध्वस्त मनाचा व जीवनाचा तो आलेखच होय. स्त्रीकडे भोगदासी म्हणून पाहणा-या मानवी विकृतीचे इतके भेदक चित्र आज अन्यत्र नाही. हंसा वाडकरांनी पुरुषी अहंकाराचा मुखवटा फाडून टाकला आहे. स्त्रीच्या वाटेला आलेले दु:ख नव्हे, लादलेले दु:ख किती भीषण व आसुरी असू शकते आणि या दु:खामुळे स्त्रीमनाची होणारी तडफड किती जीवघेणी असू शकते याचे विदारक चित्र म्हणजे हंसाबाईंचे आत्मकथन. अत्यंत मुक्तपणे पण संयततेने आपल्या मनाची दारे उघडण्यात हंसाबाईंना कमालीचे यश लाभले आहे." [१६]

ही आत्मकथने जशी दलितेतर स्त्रियानी लिहीली तशीच ती दलित स्त्रीयांनीही लिहीली. विश्वाचे एक वेगळे दाहकपण त्यातून जाणवले याविषयी गंगाधर पानतावणे म्हणतात.- " दलित स्त्री - आत्मकथनांनी तर एकूण स्त्री-आत्मकथनाला एक नवाच आशय दिला आहे. ही आत्मकथने मनोरंजनासाठी जन्मली नाहीत, की आठवणींचा रम्य चाळा करण्यासाठी. जीवनाचे, विषम समाजस्थितीचे दाहक सत्य प्रतिपादण्यासाठीच ही आत्मकथने उदयाला आली. अनुभवांच्या वेगळेपणामुळे या आत्मकथनांना सजीवत्व प्राप्त झालेले आहे. आत्मसमर्थनाच्या आहारी न जाता आणि कुणाच्या सहानुभूतीसाठी हात न पसरता ही आत्मकथने उभी आहेत. दलित लेखिकांची " स्त्री " म्हणून दु:खे आहेतच पण त्यापेक्षाही दलित स्त्री म्हणून तिच्या वाटयाला आलेले जन्मदु:ख शब्दातीत आहे. कोणत्याही दैववादाने किंवा नियतीमुळे तिचे सामाजिक दु:ख जन्मले नाही, तर अनीतिशरण आणि वर्चस्वखोर, उद्दाम संस्कृतीने तिला अप्रतिष्ठित राखले याचा शिलालेख म्हणजे दलित स्त्रीआत्मकथने , दलित

कुटुंबसंस्था, दलित स्त्री-पुरुष यांतील द्वंद्व, रुढीदास्य, पुराण मानसिकता यातून नव्या मानसिकतेची शोधयात्रा या आत्मकथनातून विदारकपणे मांडली आहे. " जन्माची चित्तरकथा " (शांताबाई कांबळे) सांगतानाच, " आमचं जिणं " ( बेबी कांबळे ) किती दाहक आहे, याचा अंत:स्फोट ( कुमुद पावडे ) दलित स्त्री आत्मकथनांच्या रुपाने झाला. एका परीने " मिटलेली कवाडे " ( मुक्ता सर्वगोड ) सताड उघडली. मराठी स्त्री - आत्मकथनाला आपल्या समृध्द अनुभवांनी योगदान देणारी ही आत्मकथने ठरावीत. आपण जे जीवन जगलो ते अत्यंत निर्भीडपणे व मुक्तपणे व्यक्त करणारी दलित स्त्री-आत्मकथने म्हणजे मराठी आत्मकथनाला गवसलेली एक नवी दिशाच होय. "[१७]

एकूणच स्त्रीवादी साहित्याचा विचार आपण जेंव्हा करतो तेंव्हा पुढील गोष्टींची जाणीव होते. स्त्रीच्या म्हणून असलेल्या, मानले गेलेल्या भुमिकांना नकार देणे, स्त्रीच्या दुय्यमत्वाचा धिक्कार करून समतेची मागणी करणे, आपल्यावर होणा-या अन्यायाची जाणीव होणे व या अन्यायाला साहित्यातून वाचा फोडणे, सामाजिक निर्णय प्रक्रियेत स्त्रीयांच्या सहभागाची मागणी करणे. स्त्रीच्या समजल्या जाणा-या जुन्या प्रतिमांना आव्हान देणे, केवळ देवी वा शारीरिणी ही भूमिका सोडून आपल्या माणूसपणाची भूमिका स्वत: प्रयत्न पूर्वक स्विकारणे व इतरांशी झगडून त्यांना स्विकारायला लावणे, सामाजिक मुख्य प्रवाहात सामिल होणे आणि या सर्वांचा अर्थ पुरुषी नव्हे तर आपल्या शारिरिक वैशिष्टयासह आपले वेगळेपण विविध दृष्टिकोनातून साहित्यातून प्रकट केले जाऊ लागले.

स्त्रीवादाच्या संदर्भात मराठी साहित्यामध्ये चर्चा सुरु झाली असली तरी ज्या स्त्री लेखिकानी साहित्य निर्माण केले ते पूर्णपणे "स्त्रीवादी" साहित्य आहे असे म्हणता येत नाही. या स्त्रीवादाच्या वैशिष्टयांचा आढळमात्र या प्रकारच्या साहित्यातून दिसतो. या संदर्भात आपल्याला "मला उद्ध्वस्त व्हायचंय" व 'अंत:स्फोट' या दोन कलाकृतींचा विचार करावयाचा आहे.

## संदर्भ सूची


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) गीता साने | .. | भारतीय स्त्री जीवन | पृष्ठ क्र. | २० |
| २) डॉ. नाडगोडा | .. | भारतीय स्त्री जीवन | पृष्ठ क्र. | ३५ |
| ३) संपा. धनंजय कीर<br>स.ग. मालशे | ...<br>... | महात्मा फुले समग्र ग्रंथ | पृष्ठ क्र. | ४२७ |
| ४) कित्ता | ... | महात्मा फुले समग्र ग्रंथ | पृष्ठ क्र. | ३७४ |
| ५) उर्मिला पवार | ... | डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ | पृष्ठ क्र. | ५०४ |
| ६) निलिमा भावे | ... | स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊल खुणा. | पृष्ठ क्र. | ११ |
| ७) अश्विनी धोंगडे | ... | मराठी वाड.मयातील नवीन प्रवाह संपा. शरणकुमार लिंबाळे | पृष्ठ क्र. | ९० |
| ८) अश्विनी धोंगडे | ... | स्त्रीवादी समीक्षा:स्वरूप आणि उपयोजन प्रस्तावना. | प्रस्तावना. | |
| ९) कित्ता | ... | - " - | पृष्ठ क्र. | ४७ |
| १०) तसलिमा नसरिन | ... | निर्वाचित कलाम | पृष्ठ क्र. | ३ |
| ११) डॉ. शुभांगी मूतकर | ... | दक्षिण महाराष्ट्र साहित्य-पत्रीका, आक्टो. ९७ अंक-३ | पृष्ठ क्र. | ७ |
| १२) डॉ. अश्विनी धोंगडे | ... | स्त्रीवादी समीक्षा: स्वरूप आणि उपयोजन | पृष्ठ क्र. | ५० |
| १३) डॉ. अश्विनी धोंगडे | ... | महाराष्ट्र साहित्य पत्रिका ऑगष्ट - ९१ | पृष्ठ क्र. | ५७ |
| १४) डॉ. अश्विनी धोंगडे | ... | मराठी वाड.मयातील नवीन प्रवाह-संपा. शरणकुमार लिंबाळे | पृष्ठ क्र. | ९६ |
| १५) कित्ता | ... | - " - | पृष्ठ क्र. | ९६ |
| १६) प्रा. चंद्रकुमार नलगे<br>डॉ. गंगाधर पानतावणे | ... | स्त्री आत्मकथन | प्रस्तावना | |
| १७) कित्ता | ... | - " - | प्रस्तावना | |